International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक व्यवसायाअंतर्गत असलेल्या कृषी व्यवसायातील लोकसंख्येच्या स्वरूपाचे भौगोलिक अध्ययन

**प्रशांत तुळशिराम शेंडे[1], प्रा. डॉ. कल्पना आ. देशमुख[2]**
*[1] संशोधक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.*
*[2] मार्गदर्शक तथा भूगोल विभाग प्रमुख,*
*बाबाजी दाते कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ (संशोधन केंद्र क्र. 402).*
*Corresponding Author – प्रशांत तुळशिराम शेंडे*
**DOI - 10.5281/zenodo.15247539**

**सारांश:**

*मानव आपल्या उपजीवीकेसाठी जे कार्य करत असतो. तो त्याचा व्यवसाय म्हणून ओळखल्या जातो. म्हणजेच मानवाद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक क्रियेस 'व्यवसाय' असे म्हणतात. एखादया देशाची व्यावसायीक रचना श्रमजीवी लोकांच्या दृष्टीने महत्वाची असते. व्यावसायिक रचनेच्या अभ्यासातून देशाची अर्थव्यवस्था कोणत्या प्रमुख व्यवसायावर आधारीत आहे किंवा देशाची आर्थिक प्रगतीची पातळी किती आहे याबद्दलची माहिती मिळते.*

*कोणत्याही प्रदेशातील व्यवसायिक संरचना सारखी असली तरी तिचा आकृतिबंध, सेवा, दर्जा व उत्पादन क्षमता समानच असेल असे सांगता येणार नाही. एखादा देशातील अर्थव्यवस्थेने कोणता स्तर गाठला आहे, त्यावर तेथील व्यवसाय रचना, सेवा व दर्जा अवलंबून असतो. तसेच कोणत्याही देशाच्या कार्यक्षम शक्तीवरुन तो देश कोणत्या स्तरावर आहे, याचे ज्ञात होते व त्याची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे की, औद्योगिक प्रदान आहे हे अर्थव्यवस्थेचे वरुनच कळते. त्याचसोबत त्या देशाचा आर्थिक स्तर कसा आहे हे पण समजते.*

*जगातील व्यवसायांना अभ्यासाच्या दृष्टिकोनातून प्राथमिक, द्वितीयक आणि तृतीयक अशा ०३ भागात वर्गीकृत करण्यात येते. त्यातील प्राथमिक व्यवसाय हे त्या प्रदेशातील मुलभुत व्यवसाय असतात. प्राथमिक व्यवसायाअंतर्गत अनेक व्यवसाय येतात त्यापैकीच प्रमुख व्यवसाय म्हटले तर कृषी हा आहे. यालाच इंग्रजीत (Agriculture) असे म्हणतात. यवतमाळ हा कृषी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. आपण कृषी हा प्रमुख व्यवसाय असल्याने या संदर्भात समस्या हि तेवढ्याच प्रमाणात उद्भवत असल्याचे दिसून येतात. म्हणूनच यवतमाळ जिल्ह्यामधील प्राथमिक व्यवसायाअंतर्गत असलेल्या कृषी व्यवसायातील लोकसंख्येच्या स्वरूपाचे भौगोलिक अध्ययन या शोधनिबंधाच्या अनुशंगाने करण्यात आलेले आहे.*

***बीज संज्ञा : व्यवसायिक संरचना, तिचा आकृतिबंध, प्राथमिक व्यवसाय, कृषी व्यवसाय***


**प्रस्तावना :**

कोणत्याही प्रदेशाच्या विकासात संसाधन लोकसंख्या, त्या प्रदेशातील शहरी केंद्रे (Urban Ceatre) व ग्रामीण विभाग महत्त्वाची भूमिका बजावतात. यवतमाळ हा ग्रामीण विभागात मोडणारा जिल्हा आहे. या जिल्ह्यातील एकूण १६ तहसिल पैकी केवळ ८ तहसील या शहरी विभागात समाविष्ट आहेत, उर्वरीत ८ तहसिलींचा समावेश ग्रामीण भागात होतो. तद्वतच यवतमाळ जिल्ह्यात उद्योग फारसे विकसित झाले नाहीत. जे काही उद्योग आहेत ते सुध्दा कृषीवर आधारित आहेत. तसेच हा जिल्हा शेतीबहूल असल्याने या जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या

झालेल्या आहे. अश्या जिल्ह्याचा विकास होण्याच्या दृष्टीने येथील प्राथमिक व्यवसायाअंतर्गतच्या कृषी व्यवसायातील लोकसंख्येचे स्वरूप कशा पध्दतीचा आहे, अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

यवतमाळ जिल्ह्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्येचे स्वरूप अभ्यासण्यासाठी अभ्यास क्षेत्राचे सीमांकन करणे महत्वाचे ठरते. प्रस्तुत अभ्यासासाठी विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याची निवड करण्यात आलेली असून या जिल्ह्याचे भौगोलिक स्थान १९.२६' व २०.४२' उत्तर अक्षांश आणि ७७.१८' व ७९.९' पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र सुमारे १३५८४ चौ.कि.मी. असून त्यामध्ये १६ तालुक्यांचा समावेश आहे.



Source:- District Census Handbook of Yavatmal District - 2011

नकाशा क्रमांक २.१

**परिकल्पना:**

यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक व्यवसायांतर्गत कृषी व्यवसायाचे स्वरूप स्थलकालपरत्वे बदलते असून त्यामुळे कृषी व्यवसायातील लोकसंख्येच्या प्रमाणात विविधता निर्माण झालेली आहे.

**अभ्यासाची उद्दीष्टे :**

१) प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाणाचा अभ्यास करणे.

२) प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाणाची भूमिका अभ्यास करणे.

३) प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाणाचे प्रकार अभ्यास करणे.

**कार्यपध्दती व सांख्यीकी :**

प्रस्तुत लघुशोध निबंधाकरिता यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाणाचे स्वरूप यांचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक आणि आर्थिक समालोचन आणि महाराष्ट्र जनगणना अह्वालाद्वारे प्रसिध्द झालेल्या दुय्यम लोकसंख्येच्या निर्देशकाचा उपयोग करुन अभिक्षेत्राचे चित्रण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

जिल्ह्यातील कृषी व्यवसायातील लोकसंख्येची दुय्यम स्वरुपाची आकडेवारी घेऊन त्यावर प्रक्रिया व आवश्यकतेनुसार आकडेवारीचे वेगवेगळ्या पद्धतीने विश्लेषण करण्यात आले. त्याकरीता प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसाय करणाऱ्या लोकसंख्येचे दुय्यम आकडेवारीच्या उपयोग करण्यात आलेला आहे. व आलेख विश्लेषण पद्धतीचा व वर्णनात्मक विश्लेषण पद्धतीचा वापर करून सदर संशोधन केलेले आहे.

**संशोधनाचे महत्त्व:**

विदर्भातील कृषी करणारा जिल्हा हा यवतमाळ असून, यवतमाळ या जिल्ह्याला "कॉटन सिटी" म्हणून संबोधले जाते. या जिल्ह्यात कापूस, तूर, सोयाबीन, या प्रमुख पीकाची लागवड केली जाते. पाऊसाचे प्रमाण आणि पीक उत्पादन यांचा व्यवस्थित तालमेळ बसतो, म्हणूनच हे उत्पादन या जिल्ह्यात जास्त प्रमाणात घेतले जातात. परंतु, दिवसेंदिवस काम करणाऱ्या लोकसंख्यांचे प्रमाण वाढतच आहे. त्या तुलनेने कृषी योग्य जमीन मात्र कमी पडत आहे.

तसेच शेतीतील उत्पादन देखील लोकसंख्याच्या प्रमाणात घटतच आहे, त्याच बरोबर कामगारला योग्य मोबदला देखील मिळत नाही आणि प्रत्येक वर्षी महागाई वाढतच जात असल्याचे दिसते, बेरोजगार, दारिद्रय, गरिबी, उपासमारी आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त इत्यादी समस्या भेडसावत आहे. म्हणूनच संशोधन करताना प्राथमिक व्यवसाय अंतर्गत कृषी व्यवसाय अभ्यासने हे अत्यंत महत्वाचे वाटते. कृषी करणाऱ्या लोकसंख्यांचे प्रमाण अभ्यासून त्यावर शाश्वत उपाय योजना करता येईल. या हेतूने संशोधन करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्येचे स्वरूप घेतले आहे.

**विषय विवेचन:**

**प्राथमिक व्यवसाय म्हणजे काय? :**

निसर्गातील संसाधनांचा थेट वापर करून उत्पादन करणारा व्यवसाय म्हणजे प्राथमिक व्यवसाय. या व्यवसायांमध्ये शेती, मासेमारी, खाणकाम, जंगल उत्पादन, शेळीपालन इत्यादींचा समावेश होतो. प्राथमिक व्यवसाय हा देशाच्या अर्थ व्यवस्थेचा भाग आहे. प्राथमिक व्यवसायाचे वैशिष्ट्ये बघायचे झाल्यास प्राथमिक व्यवसाय हा निसर्गाशी संबंधीत, निसर्गावर अवलंबून, असतो. मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ लागतो. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार निरनिराळ्या भागात वेगवेगळे प्राथमिक व्यवसाय चालतात. त्याचप्रमाणे या व्यवसायात श्रमाच्या मानाने मोबदला कमी मिळतो.

प्राथमिक व्यवसायाचे उदाहरणे- शेती, मासेमारी, खाणकाम, वनीकरण, खनिज शोषण, शेळीपालन, आणि जंगल उत्पादन इत्यादी. प्राथमिक व्यवसायात काम करणाऱ्या व्यात्त्कींना शेतकरी, मच्छिमार, खाण कामगार असे म्हणतात.

**कृषी व्यवसाय म्हणजे काय? :**

शेती आणि व्यवसाय या दोन्ही शब्दांचा मिलाफ करून कृषी व्यवसाय हा शब्द तयार झाला. कृषी व्यवसायात शेतीशी संबंधित सर्व आर्थिक क्रीयाकलापांचा समावेश होतो. कृषी व्यवसायात शेती आधारित वस्तूंचे उत्पादन, प्रक्रिया आणि वितरण समाविष्ट आहे.

कृषी व्यवसायात शेती उपकरणे निर्मिती, खतांचा पुरवठा आणि कीटकनाशके, कृषी संशोधन आणि विकास यांचा समावेश होतो. कृषी व्यवसायात पिकांच्या वाढीपासून ते अन्नावर प्रक्रिया करण्यापर्यंत सर्व गोष्टींचा समावेश होतो. कृषी व्यवसाय हा जैव-व्यवसाय म्हणूनही ओळखला जातो. हा व्यवसाय अन्न टिकाऊ पणा आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणास प्रोत्साहन देतो.

शेतीला आर्थिक समस्या हि निर्माण होतात जसे की, अनिश्चित पाऊस, अपुरे सिंचन, मातीचा पोत, विविध प्रकारच्या लागवडीच्या पद्धती, अयोग्य पीक तंत्र आणि कमी होत चाललेली जिरायती जमीन यासह यवतमाळ जिल्ह्यातील तालुक्यातील शेतीसमोर आव्हाने आहेत. हे घटक एकत्रितपणे कृषी उत्पादकतेवर परिणाम करतात. अन्न सुरक्षा आणि ग्रामीण जीवनमान सुनिश्चित करण्यासाठी उपायांची आवश्यकता आहे. यवतमाळ जिल्ह्याची प्रमुख भाषा हि मराठी आहे परंतु लोक प्रामुख्याने वऱ्हाडी बोली भाषा बोलतात. दिवसेंदिवस लोकसंख्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येते. यवतमाळ जिल्हा नेहमीच वादाच्या भोवऱ्हात सापडलेला असून, शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून संबोधतात. तसेच कॉटन

सिटी देखील म्हणतात. म्हणूनच या जिल्हाचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. यवतमाळ जिल्ह्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्येचे स्वरूप अभ्यास करणे आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हि यवतमाळ सारख्या जिल्ह्याला काळाची गरज असल्याचे दिसून येते. म्हणूच यवतमाळ जिल्ह्यातील सोळा तालुक्यातील कृषी व्यवसायातील लोकसंख्येचे प्रमाण अभ्यासून त्या संदर्भात उपाय शोधणे. जेने करून चांगला व्यवसाय करून आपआपले भरण पोषण करून विकासाच्या दृष्टीने विचार करता येईल.

एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत अनेक व्यवसाय येतात त्यापैकीच प्रमुख व्यवसाय म्हटले तर कृषी हा आहे. यालाच इंग्रजीत (Agriculture) असे म्हणतात. यवतमाळ हा कृषी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. म्हणूनच आपण कृषी हा प्रमुख व्यवसाय असल्याने या संदर्भात समस्या हि तेवढ्याच उद्धवतात. आपल्याला आलेख व ग्राफचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल. दसवर्ष २००१ ते २०११ यावरून दसवर्ष २०२१ ची प्रक्षेपित टक्केवारी काढले. नेर तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९७.९९ टक्के इतके आहे. बाभूळगाव तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९७.०७ टक्के इतके असून यवतमाळ जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकार कृषीवर कमी अवलंबून असणारे लोकसंख्या प्रमाण आहे. कळंब तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.२१ टक्के इतके आहे.

**सारणी क्र. १**


**यवतमाळ जिल्हा - एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण (२००१ ते २०२१)**

| अ. क्र. | तालुके | एकूण प्राथमिकव्यवसायातील लोकसंख्येसोबत प्रमाण % | | |
|---|---|---|---|---|
| | | २००१ | २०११ | २०२१ (प्रक्षेपित) |
| १. | नेर | 95.70 | 96.56 | 97.99 |
| २. | बाभूळगाव | 96.31 | 96.33 | 97.07 |
| ३. | कळंब | 96.67 | 97.18 | 98.21 |
| ४. | यवतमाळ | 95.15 | 96.68 | 96.51 |
| ५. | दारव्हा | 96.79 | 97.25 | 97.36 |
| ६. | दिग्रस | 96.39 | 97.75 | 98.29 |
| ७. | पुसद | 96.61 | 97.09 | 98.22 |
| ८. | उमरखेड | 95.94 | 97.37 | 97.66 |
| ९. | महागाव | 96.95 | 97.38 | 98.39 |
| १०. | आर्णी | 97.32 | 98.59 | 98.98 |
| ११. | घाटंजी | 98.15 | 98.70 | 98.80 |
| १२. | केळापूर | 97.02 | 97.98 | 98.24 |
| १३. | राळेगाव | 96.75 | 98.00 | 98.28 |
| १४. | मारेगाव | 97.95 | 98.37 | 98.10 |
| १५. | झरीझामणी | 98.28 | 98.48 | 99.26 |
| १६. | वणी | 99.12 | 99.23 | 99.65 |
| **एकूण** | | **96.88** | **97.65** | **98.17** |

स्रोत - जनगणना अहवाल, यवतमाळ जिल्हा (२००१, २०११) आणि प्रक्षेपण संशोधकाने काढले.

यवतमाळ तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९६.५१ टक्के इतके असून सर्वात कमी कृषीवर अवलंबून असणारे लोकसंख्या प्रमाण या तालुक्यात आहे. दारव्हा तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९७.३६ टक्के इतके असून यवतमाळ जिल्ह्यात तिसऱ्या क्रमांकार कृषीवर कमी अवलंबून असणारे लोकसंख्या प्रमाण आहे. दिग्रस तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.२९ टक्के इतके आहे. पुसद तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.२२ टक्के इतके आहे. उमरखेड तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण वर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९७.६६ टक्के इतके आहे. महागाव तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.३९ टक्के इतके आहे. आर्णी तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण वर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.९८ टक्के इतके असून यवतमाळ जिल्ह्यात तिसऱ्या क्रमांकार कृषीवर अवलंबून असणारे लोकसंख्या प्रमाण आहे. घाटंजी तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.८० टक्के इतके आहे.

**यवतमाळ जिल्हा – एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण (२००१ ते २०२१)**




केळापूर तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.२४ टक्के इतके आहे. राळेगाव तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.२८ टक्के इतके आहे. मारेगाव तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.१० टक्के इतके आहे. झरीजामणी तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या

प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९९.२६ टक्के इतके असून यवतमाळ जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकार कृषीवर अवलंबून असणारे लोकसंख्या प्रमाण आहे. वणी तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण दसवर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९९.६५ टक्के इतके असून सर्वात जास्त कृषीवर अवलंबून असणारे लोकसंख्या प्रमाण या तालुक्यात आहे.

एकंदरीत, यवतमाळ जिल्ह्याच्या १६ तालुक्यातील एकूण प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या प्रमाण वर्ष २०२१ मधील (प्रक्षेपित) ९८.१७% इतके असून सर्वात जास्त वणी तालुका कृषी व्यवसायावर अवलंबून असल्याचे दिसते, तर त्या पाठोपाठ झरीजामणी आणि आर्णी तालुका ही कृषी व्यवसायावर अवलंबून असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे सर्वात कमी कृषी व्यवसायावर अवलंबून असणारे तालुकेही आहे. त्यामध्ये सर्वात कमी कृषी व्यवसायावर अवलंबून असणारे तालुका यवतमाळ असून, त्याचबरोबर प्राथमिक व्यवसायाअंतर्गत कृषी व्यवसायातील लोकसंख्या कमी प्रमाणात असलेला बाभूळगाव तालुका असून हा तालुका दुसऱ्या क्रमांकावर तर दारव्हा तालुका तिसऱ्या क्रमांकावर येतो.

**परिणाम :**

१) कृषी व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय म्हणून केला जातो, म्हणून कामगार हा फक्त कृषितच जास्त आहे.

२) लोकसंख्यांच्या प्रमाणात कृषी कमी असल्याने कृषीला जोड व्यवसाय म्हणून इतर व्यवसाय करतात.

३) फक्त कृषी व्यवसायावरच अवलंबून असणारी लोकसंख्या स्वतःचे भरण पोषण हि करू शकत नाही.

**निष्कर्ष :**

१) कृषी व्यवसाय हा पारंपारिक पद्धतीने केला जातो असे आढळते.

२) कमी प्रमाणात कृषीला जोड व्यवसाय होत आहे.

३) काही तालुक्यातच कृषी हा व्यवसाय कमी प्रमाणात करत असल्याचे लोकसंख्या प्रमाणात दिसून येते.

**संदर्भ सूची :**

१) जनगणना अहवाल , यवतमाळ जिल्हा – २००१, २०११.

२) नेगी डॉ.बलबीर सिंह,‘संसाधन भूगोल’, एस. जे. पब्लीकेशन्स, मेरठ.

३) इंटरनेट, वृत्तपत्र.